# रे.दि.मु.नं. २८/२०१७ मधील नि.२८ खालील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज यातील वादीने दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जात नमुद केले आहे की, Typing Mistake मुळे गट नं.४००अ ऐवजी गट नं.३९७ दाव्यामुध्ये नमुद केलेले आहे. सदरची दुरुस्ती औपचारीक स्वरुपाची आहे. याउलट प्रतिवादी नं.१ ते ३ चे कथन असे आहे की, सदरची दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होतो व दाव्याचे संपूर्ण चतुःसीमा बदलत आहे व त्यामुळे दुरुस्ती करता येणार नाही. तसेच, प्रतिवादी नं.४ व ५ यांनी नि.३१ वर सदर अर्जास म्हणणे दिले आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे प्रस्तुत प्रतिवादींना त्रास होणार आहे. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

**२.** नि.२८ मध्ये नमुद केलेली दुरुस्ती ही Typing Mistake ने होवू शकते. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही असे माझे मत आहे. त्यामुळे नि.२८ मधील नमुद केलेली दुरुस्तीस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा (नि.२८) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी नं.१ ते ३ यांना एकत्रितरित्या मिळून र.रु.५००/- खर्च दयावा. तसेच, वादीने प्रतिवादी नं.४ व ५ एकत्रितरित्या मिळून र.रु.५००/- खर्च दयावा.

३. वादीने सदरची दुरुस्ती विहीत कालावधीत करावी.

खंडाळा
दिनांकः ०८/०१/२०१९

(डी.एम.गिरी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा

**<u>रे.दि.मु.नं. १६३/२०१५ मधील नि.१२ खालील आदेश</u>**

**१.** सदरचा अर्ज वादी तर्फे वादी वारस रेकॉडवर घेणेस झालेला विलंब माफ होणेसाठी केला आहे.

**२.** वादीने अर्जामध्ये कथन केले की, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं.१ लक्ष्मण भगवान खरात हे दिनांक २९/११/२०१७ रोजी मयत झाले आहे. वादी हे मुंबई येथे राहत असल्यामुळे वादीस मृत्युची माहिती मिळाली नाही. प्रतिवादीनी मृत्युची पुरशीस दाखल केली नाही तसेच वादी आजारी होता त्यामुळे प्रतिवादी नं.१ यांचे वारस सामील करु शकला नाही. त्यांचेपश्चात त्यांची पत्नी, दोन मुले व एक मुलगी असे वारस आहेत. सबब, सदर कामी मयत प्रतिवादी नं.१ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द होवून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी.

**३.** सदर कामी प्रतिवादी तर्फे म्हणणे की, वादीचा अर्ज हा कायदेशीर नाही. प्रतिवादी नं.१ हा दि.२९/११/२०१७ रोजी मयत झालेला आहे. वादीने प्रतिवादी नं.१ याचे वारस कायदयास मुदतीमध्ये पटलावर घेतले नाहीत. वादीने सदर अर्जास विलंब झालेला आहे. प्रतिवादी नं.१ याचे विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रतिवादी नं.१ याचे वारसांचे विरुध्द दावा अबेट झालेला

असलेने अबेटमेंटचा आदेश Set aside केले खेरीज प्रतिवादी नं.१ याचे वारस रेकॉर्डवर घेता येणार नाहीत. सबब, वादी अर्ज नामंजुर करणेत यावा. अगर अर्ज मंजूर केल्यास कॉस्ट करणेत यावी.

**४.** सदर कामी अर्जाचे व लिखित जबाबाची पाहणी केली असता प्रस्तुत मयत प्रतिवादी नं.१ लक्ष्मण भगवान खरात यांचेबाबत झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द केल्यास मुळ दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची व कादयावर विसंबून अशी आहे. त्यामुळे वादीच्या दाव्यामधील कथनांवर कुठलाही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून न्यायाचे दृष्टीने दावा संपुष्टात करण्याचा आदेश रद्द करुन अर्ज खर्चासहीत मंजूर करणेत येतो. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा (नि.१२) चा अर्ज र.रु २००/- (दोनशे फक्त) खर्चासहीत मंजूर करण्यात येतो.

**खंडाळा** **(डि.एम.गिरी )**
**दिनांकः २५/०६/२०१८** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा**